## <u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी सत्यप्रतिज्ञेवर सुरु.</u>

मोटार अपघात नुकसान भरपाई<br>अर्ज क्र.१६७/२०२१<br>जुना M.A.C.P. क्र.६२/२०१९<br>परशराम –वि.– प्रद्युम्नभाई<br><u>निशाणी क्र.२५ खाली</u>

**<u>पुढील सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. बी.के. टावरी यांचेमार्फत शपथेवर सुरु...</u>**

६. शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आलेले असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. ए ए फॉर्मची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२६</u>** वर आहे. एफ.आय.आर.ची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२७</u>** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२८</u>** वर आहे. इनक्वेस्ट पंचनाम्याची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२९</u>** वर आहे. शवविच्छेदन अहवालाची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.३०</u>** वर आहे. माझ्या वडीलांचे २०१४–२०१५, २०१५–२०१६, २०१६–२०१७, २०१७–२०१८ व २०१८–२०१९ चे इनकमटॅक्स ॲक्नॉलेजमेंट आणि व्हेरिफीकेशन फॉर्म **<u>निशाणी क्र.३१</u>** <u>ते</u> **<u>निशाणी क्र.३५</u>** वर आहे. (निशाणी क्र.३६ वर गैरअर्जदार क्र.३ यांनी इनकमटॅक्स दस्तांना निशाणी क्रमांक देण्यास हरकत उपस्थित केली.). दोषी वाहन जी.जे.०३ एटी २७०७ चे मालवाहतुक परवान्याची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.३८</u>** वर आहे. अपघातग्रस्त वाहन क्र. एम.एच.०१ एआर ४७०५ या कारचे नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रत **<u>निशाणी क्र.३९</u>** वर आहे. सदर कारच्या इंशुरंसच्या शेड्युल्डची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.४०</u>** वर आहे. दोषारोपपत्राची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.४१</u>** वर आहे.

७. (अर्जदाराच्या वकीलांनी अपघातग्रस्त दोषी वाहन क्रमांक जी.जे.०३ एटी २७०७ च्या चालकाचा वाहन चालवण्याचा परवाना, त्या वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत आणि इंशुरंस पॉलीसीची प्रत यांना पुराव्यात वाचण्यास विनंती केली. त्यांच्या युक्तीवादानुसार एकाच अपघातामधुन एकुण चार क्लेम पिटीशन दाखल झाले आहे त्यामधील क्लेम पिटीशन M.A.C.P. क्र.१३८/२०२१ मध्ये संबंधीत पोलीस

निरीक्षकांनी साक्षांकित केलेले ते दस्त दाखल केलेले आहेत. त्या दस्तावरुनच प्रस्तुत प्रकरणात प्रती दाखल केल्या असल्याने त्यांना निशाणी देण्यास विनंती करण्यात आली. यास गैरअर्जदार क्र.३ तर्फे हरकत घेण्यात आली. परंतु प्रकरणाचे स्वरुप पाहता आणि याच अपघातामधुन निर्माण झालेल्या दुसऱ्या प्रकरणात साक्षांकित प्रती दाखल केल्या असल्याने त्या पाहुन प्रस्तुत प्रकरणातील दोषी वाहनाचा चालक परवाना, नोंदणीप्रमाणपत्र आणि विम्यासंदर्भातील दस्त यांच्या प्रतींना निशाणी क्रमांक देण्यात येत आहे.) ते दस्त अनुक्रमे **निशाणी क्र.४२, ४३ व ४४** वर आहे.

८. मृतक नविन यांचा वाहन परवाना अपघात झाला त्यावेळी पोलीसांनी ताब्यात घेतला होता आणि तो त्यांच्या ताब्यात आहे. त्याची साक्षांकित प्रत पोलीसांनी दिली असुन ती M.A.C.P. क्र.१६८/२०२१ मध्ये दाखल आहे. त्याची प्रत या प्रकरणात सादर केली असुन ती **निशाणी क्र.४५** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**गैरअर्जदार क्र.१ व २ तर्फे कोणीही हजर नसल्याने उलटतपास नाही...**

**उलटतपास– गैरअर्जदार क्र.३ तर्फे विधीज्ञ श्री. बी.बी.पांडे यांचेमार्फत सुरु...**

९. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात होतांना पाहीलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची खबर मी पोलीस ठाण्यात दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब तपासादरम्यान घेतला नाही. पोलीस ठाण्यात अपघाताचा कोणी रिपोर्ट दिला ते मला माहित नाही. लालचंद लालवानी हे माझे नातेवाईक नाही. कारचा ज्यावेळी अपघात झाला त्यावेळी कारमध्ये चार सज्ञान आणि दोन अज्ञान मुले होती. त्या दोन मुलांचे वय अनुक्रमे १३ वर्ष आणि ११ वर्ष होती. रिपोर्ट ज्यांनी दिला त्यांनी ही घटना पाहीली हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्यावेळी कोणाची चुक होती हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, कारचा अपघाताच्यावेळी कॉम्प्रीहेंसिव विमा नव्हता. साक्षीदार स्वतः सांगतो की थर्ड

पार्टी विमा होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडल्यानंतर आम्हाला माहिती होते की कारमधील प्रवाशांचा विमा घेतलेला नाही.

१०. हे मला माहिती नाही की त्यामुळे कारमधील मृत व्यक्तींना आणि जखमी व्यक्तींना विमा कारच्या पॉलीसीवर मिळणार नाही हे मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कार चालकाच्या चुकीमुळे आणि निष्काळजीपणाने तो अपघात झाला आणि तो एकटाच या अपघाताला जबाबदार होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच ट्रक चालकाच्या विरुध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दाखल करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, अपघात घडला त्यावेळी चालकाच्या बाजुला आणखीन दोन व्यक्ती बसलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, कारच्या परवान्यापेक्षा जास्त व्यक्ती कारमध्ये बसले होते.

११. हे म्हणणे खरे नाही की, अपघातास ट्रक चालक कारणीभुत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्यावेळी माझ्या आईचे वय ४८ वर्षापेक्षा जास्त होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे वार्षीक उत्पन्न ६,००,०००/– रुपये पेक्षा जास्त होते असे मी नुकसानभरपाई जास्त मिळण्यासाठी खोटे लिहीले आहे. माझ्या आईकडे व्यवसायासाठी शॉपअॅक्ट लायसन्स नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी नमुद केल्याप्रमाणे माझी आई कपड्याचा अथवा इतर कोणताही व्यवसाय करत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आईच्या उत्पन्नाविषयी दाखल केलेले निशाणी क्र.३१ ते ३५ वरील दस्त खोटे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणुनबुजुन साक्षांकित लेखाजोखा दाखल केला नाही. ज्या आधारे आयकर परतवा दाखल केला ते दस्त जाणुनबुजुन या प्रकरणात सादर केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आईच्या मृत्युनंतर जे आयकर परतावे भरले ते जाणुनबजुन नुकसान भरपाई वाढवुन मिळण्यासाठी भरले. हे म्हणणे खरे नाही की, आईच्या उत्पन्नाबाबत आणि वयाबाबत जे काही नमुद केले ते खोटे नमुद केले.

१२. माझे वडील परसराम यांचे विद्युत उपकरणाचे दुकान आहे. मी याच वर्षी सी.ए. पर्यंत पुर्ण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी माझ्या शिक्षणाचा

संपुर्ण खर्च केला. मागील २५ वर्षापासुन माझ्या वडीलांचे विद्युत उपकरणाचे दुकान आहे. माझे वडील आयकर परतावा भरतात. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि माझे वडील हे आईच्या उत्पन्नावर अवलंबुन नव्हतो.

१३. ट्रक चालकाकडे ट्रक चालविण्याचा परवाना नव्हता हे मी सांगु शकत नाही. ट्रकचे फिटनेस प्रमाणपत्र आणि परमीट नव्हता हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जास्त नुकसान भरपाई मिळण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.02.23 17:16:58 +0530

दिनांक : २३/०२/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.02.23 17:17:03 +0530

दिनांक : २३/०२/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.